विश्वास पुरुषोत्तम मालशे
रूम नं ११ पुष्पकधाम बिल्डिंग
दुसरा मजला हिंदुस्थान को. ऑप
बँकेचे मागे कल्याण पश्चिम
पिन. ४२१३०१ मो.नं.: 82916 00862

शनिवार – दिनांक ३०-६-२०१२

माननीय, संमोहन उपचार तज्ञ –
प्रो० धनसिंग चौधरी यांस स.न. वि.वि.

मी खाली सही करणार विश्वास पु० मालशे आपणांस कळवू इच्छितो कि मी आणी माझा मुलगा चि० पंकज वि. मालशे आम्ही दोघांनीही आपल्या कार्यशाळेत भाग घेतला होता. (२०मे२०१२ रविवार रोजी)

आपल्या कार्यशाळेमुळे मी तर प्रभावित झालोच. पण विशेष म्हणजे आपल्या नावामुळे मी अधिक – भारावून गेलो आहे. आपलं नाव धनसिंग चौधरी हे संमोहन शास्त्राला साजेसच नांव आहे. आपल्या नावातील प्रत्येक अक्षर मला काही ना काही सांगत आहे असेच – मला वाटत असायचं. माझं कवि मन असल्यामुळे त्या (आपल्या) नावानेच मला जणू साद घातली आणी उत्स्फूर्तपणे आपणा विषयींची भावना व्यक्त करणारे शब्द मी काव्यबद्ध केले आहेत – तरी त्या सदर कवितेचा आपण स्विकार – करावा ही विनंती. सोबत कविता जोडत आहे.

विशेष म्हणजे आपल्या सीडी आम्ही – दोघेही नियमित ऐकतो. व दररोज सुचना घेत आहोत. त्यापासून लाभ होईलच – अशी – आमची श्रद्धा आहेच.

आपला नम्र

विश्वास पु० मालशे

कल्याण (प.) मो० 98216 00862

# प्रार्थना

धनिक आजवर अनेक पाहिले
पण आपण मनानही श्रीमंत
औषध-पाण्याविना रूग्ण बरे करता
जाणूनी सर्व - सामान्यांची खंत

नतमस्तक होतो आपले चरणी
कारण आपण साक्षात विघ्नहर्ता
प्रत्येकाचं मनोबल वाढवून
बनविता त्याला कर्ता-करविता

सिंघम बनविता आपण
आपल्या कार्यशाळेत येतो त्याला
अशी असंख्य माणसं घडविता
याबद्दल अभिमान वाटतो मला

गतदु:ख विसरूनी गेलो
आपली भेट होता खास
अशीच कार्यशाळा अखंड वाढत राहो
पुन:पुन्हा प्रार्थना करतो विश्वास

- विश्वास पुरूषोत्तम मालशे
मो. ८२९१६००८६२